" रात्री अनेकदा वडील ड्रिंक्स घेऊन घरी यायचे. ते घरी आले मी खूप घाबरून जात असे. मी आमच्या पलंगाच्या खाली लपून बसत असे. रात्र भर जागा असे मी. त्यांना चालता सुद्धा येत नसे. ते आल्या आल्या झोपून जात असत पण रात्री कधीतरी तीन साडेतीन वाजता ते आईला हाका मारत सुटत. घरभर खूप वास सुटलेला असे. ते बाथरूम मध्ये जाऊन आले की जाववत नसे. आईला ते शिव्या देत असत. मी आणि माझा धाकटा भाऊ घट्ट आईला चिकटून बसत असू. एकदा आम्ही नवीन घरी राहायला गेलो होतो. त्या घरातला पहिलाच दिवस होता. रात्री आईने जेवायला साबुदाण्याची खिचडी आणि दही असे केले होते. शिफ्टींग मुळे आई पण दमली होती. बाबा दिवसभर बाहेर होते . सामान हलवा हलवी मध्ये त्यांनी काहीच मदत केली नव्हती. पण खिचडी बरोबर काकडीची कोशिंबीर नाही म्हणून रागाने त्यांनी खिचडीची प्लेट भिरकावून दिली. नवीन घराच्या भिंतीवर गरम साबुदाणा चिकटून बसला. तुपाचे डाग पडले. .........."

विराज च्या डोळ्यासमोर जणू तो प्रसंग आत्ता घडत होता. तो म्हणाला , " आजकाल मुली पण प्यायला लागल्या आहेत. इतकंच नाही तर त्या व्यसनाधीन ही होतायत. माझी दुसरी कोणतीच अट नाही पण मला पार्टी संस्कृती मधली मुलगी नको. "

---

" जितका मोठा प्रोजेक्ट तितकी मोठी पार्टी. म्हणजे कसं असतं नं, समजा मी आमच्या कंपनी च्या तर्फे दुसऱ्या एका कंपनी चे काम करत असेन आणि तो प्रोजेक्ट संपला की ती कंपनी जितकी जास्त पैसेवाली तितके जास्त पैसे आमच्या पार्टी साठी ती कंपनी देते. आणि मग मोठी जंगी पार्टी असते.

त्यासाठी बरीच तयारी केली जाते. या अशा पार्टी मध्ये मुली पण असतात. बरेचदा ती पार्टी उत्तर रात्रीही चालते. आजकाल तर अनेकदा अशा पार्टी मध्ये मुलींना शुद्ध नसते. कंपनी चे ड्रायव्हर त्यांना रात्री कंपनी च्या गाडीतून सोडतात. त्यामुळे हल्ली मी कोणत्याही मुलीला भेटायला जातो तेव्हा ती ड्रिंक्स घेते का किंवा स्मोकिंग करते का हा प्रश्न आवर्जून विचारतो. "------ विनय बरीच माहिती पुरवत होता.

------------------------------------------------------------------------------------------------------------
----------------

खरोखरंच आज समाजामध्ये दारू आणि सिगारेट्स च प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेल दिसतंय. कित्येक घरांमध्ये वडील आणि मुलगा एकत्र ड्रिंक्स घेतानाच दृश्य दिसतं. लग्नाच्या संदर्भात तर हा प्रश्न खूप महत्वाचं आहे. व्यसनामुळे अनेक संसार उध्वस्त झाले आहेत.